नियुक्ती सूचना क्रमांक    दिनांक ०२ /०६ /२०२२

**-: मुंबई पोलीस शिपाई (चालक)भरती २०१९ :-**

**-: दि. ०७ /०६ /२०२२ रोजी सकाळी ८:०० वा. नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना :-**

विषय:-मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत

संदर्भ:-१) ''महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम, २०१९
२) दिनांक ३० /१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अंतरिम निवड यादी.
३) दिनांक ३० /१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अंतरिम प्रतिक्षा यादी.

उपरोक्त संदर्भानुसार मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९ भरती प्रक्रिया पार पाडण्यात आली. संदर्भ क्र. २ व ३ नुसार कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनुसार पोलीस शिपाई (चालक) यांची तात्पुरती अंतरिम निवड यादी/अंतरिम प्रतिक्षा यादी (Provisional Select List/Provisional waiting List जाहिर करण्यात आली आहे. तद्नंतर उमेदवारांची वैद्यकिय तपासणी व चारित्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सोबतच्या यादीतील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून व आवश्यक त्या प्रशासकीय बाबी विचारात घेवून नियुक्ती कार्यक्रम पत्रिकेनुसार नियुक्ती पत्र स्विकारण्यासाठी बोलविण्यात आले आहे. नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलविण्यात आले म्हणून नियुक्तीचा अधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत. यांची संबंधित उमेदवारांने नोंद घ्यावी. तसेच खाली नमुद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

**१)नियुक्तीसाठी येताना कागदपत्र पडताळणीकरिता खालील नमूद प्रमाणपत्र न चुकता सोबत आणणे आवश्यक आहे :-**

१) भरती ओळखपत्र ( मैदानी चाचणी /लेखी परिक्षेचे )

२) कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्यावेळी सादर केलेली आवश्यक मुळ प्रमाणपत्रे.
उदा. शैक्षणिक /डोमीसाईल /जातप्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेअर / होमगार्ड / प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त इत्यादि संबंधित मुळ प्रमाणपत्र.

३) ०४ पासपोर्ट साईज फोटो.

४) आधार कार्ड व पॅन कार्ड

५) दैनंदिन गरजेच्या वस्तू घेवून पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरूण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, महिलांकरिता २ ट्राऊझर, २ पांढरे टी-शर्ट, इत्यादी साहित्य सोबत आणावे. सोबत 'मेस ॲडव्हान्स' रू.२०००/- घेवून यावे. तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इत्यादी वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**२) विशेष सूचनाः-**

१) भरती ओळखपत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई (चालक) पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२) "कोविड-१९" अनुषंगाने सर्व उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी येतांना २४ तासाच्या आतील 'ॲन्टीजन चाचणी' अहवालाची प्रिंट सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्वीकरण्यासाठी हजर होते वेळी तसेच प्रशिक्षण कालावधीत शासनाच्या सर्व "कोविड-१९" विषयक मार्गदर्शक सूचनाचा अवलंब करणे अनिवार्य असेल.

**टिपः-**

नियुक्तीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांने तसेच भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळुन आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही व निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

3/6/22

( शाम घुगे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.

2/6/22
02/06.

# मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९

(पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत )

दिनांक ०७/०६/२०२२ स.८.०० वा. नियुक्तीसाठी 'पोलीस संकुल नायगांव', नायगांव पोलीस मुख्यालय, (पोलीस भरती संगणक कक्ष) नायगांव, दादर (पूर्व), मुंबई येथे कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी

| Sr No. | Chest No. | Roll No. | Candidate Name | Gender |
|---|---|---|---|---|
| 1 | 1045 | 1011716346 | TEJASVINI SANJAY WALVE | Female |
| 2 | 990 | 1011716238 | RUCHITA RAJENDRA JAGTAP | Female |
| 3 | 1026 | 1011716640 | YOGITA OMPRAKASH VARMA | Female |
| 4 | 979 | 1011716169 | AKSHATA DADASAHEB GOGAWALE | Female |
| 5 | 1029 | 1011716536 | RATNA CHHOTU BHAMARE | Female |
| 6 | 1033 | 1011716756 | SUJATA TUKARAM WAVARE | Female |
| 7 | 1027 | 1011716329 | SUJATA PANDHARINATH GHUGE | Female |
| 8 | 997 | 1011716629 | PRITI AJAY PATIL | Female |
| 9 | 1006 | 1011716180 | PRAJAKTA MADHUKAR CHALAKE | Female |
| 10 | 1013 | 1011716607 | MAYURI KISHORRAO AWARE | Female |
| 11 | 975 | 1011716583 | ANKITA DILIP KALE | Female |
| 12 | 817 | 1012621312 | GANESH SANTOBA YAMGAR | Male |
| 13 | 426 | 1011111368 | AJIT BALU KINDRE | Male |
| 14 | 6 | 1010202568 | SUMIT GOPAL DHONDE | Male |
| 15 | 713 | 1012621175 | RAVINDRA MAHADEV WAGHMARE | Male |
| 16 | 32 | 1010201904 | SHUBHAM JANARDAN SAWANT | Male |
| 17 | 610 | 1011313496 | PAWAN VILAS KHARADE | Male |
| 18 | 781 | 1012520827 | HEMANT RAVINDRA PATIL | Male |
| 19 | 422 | 1010909431 | PRAVIN MAHADEV MANE | Male |
| 20 | 760 | 1012721748 | NADIM HAMID SHAIKH | Male |
| 21 | 812 | 1012822591 | CHETAN MURLIDHAR SHINDE | Male |